## वि. दि. दा. क्र. ७/२०१८ मधील नि. क्र. ३७ खालील आदेश

CNR : MHSN05-000008-2015

(कृष्णात पाटील वि. रौनक पाटील)

## दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे अर्ज

प्रस्तुतचा अर्ज वादीने दावा दुरुस्तीसाठी दिलेला आहे.

२. वादीचे म्हणणे असे की, वादीने मूळ दावा खरेदीपत्र रद्दबातल आहे असे जाहीर हक्कज्ञापन होवून मिळण्यासाठी व निरंतरच्या मनाईसाठी दाखल केलेला आहे. वादीने प्रतिवादीविरुद्ध फौजदारी खटला क्र. ५५/२०१६ दाखल केलेला असून तो न्यायप्रविष्ट आहे. दावा दाखल करताना फौजदारी खटला क्र. ५५/२०१६ चा काही मजकुर दाव्यात नमुद करणे राहून गेले आहे. त्याचबरोबर प्रतिवादीच्या खरेदीपत्राची माहिती वादीला झाली त्याची तारीखही नमुद करणे नजरचुकीने राहून गेले आहे. त्यामुळे दुरुस्तीचा अर्ज देणे भाग पडले आहे. वादीने मागितलेल्या दुरुस्तीमुळे दाव्याच्या मूळ स्वरुपामध्ये बदल होत नाही. दुरुस्ती मंजूर केल्यास प्रतिवादीचे फारसे नुकसान होणार नाही. याउलट दुरुस्ती नामंजूर केल्यास वादीचे पैशाने न भरुन येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज दिला आहे.

३. प्रतिवादीने अर्जास विरोध करुन त्याचे म्हणणे निशाणी ४३ ला दिले आहे. प्रतिवादीने अर्जातील मजकुर नाकारला आहे. प्रतिवादीचे म्हणणे असे की, केवळ प्रतिवादीला त्रास देण्यासाठी वादीने मूळ दावा दाखल केला आहे. अर्जात मागितलेली दुरुस्ती दावा मिळकतीशी संबंधीत नाही. ती अनावश्यक आहे. केवळ प्रतिवादीने दिलेला दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ प्रमाणेचा अर्ज फेटाळण्यात आल्यामुळे प्रतिवादीतर्फे उपस्थित केलेल्या त्रूटी भरुन काढण्याच्या हेतूने वादीने दावा दुरुस्तीसाठी अर्ज दिलेला आहे. त्यामुळे तो चालण्यास पात्र

नाही. वादीने मागितलेली दुरुस्ती मंजूर केल्यास मूळ दाव्याच्या स्वरुपात बदल होणार आहे. त्यामुळे प्रतिवादीचे नुकसान होणार आहे. या न्यायालयाने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ प्रमाणे दाखल केलेल्या अर्जावरील पारित केलेल्या आदेशाविरुद्ध प्रतिवादी वरिष्ठ न्यायालयामध्ये दाद मागणार आहे. त्यामुळेही दुरुस्ती मंजूर केल्यास प्रतिवादीवर अन्याय होणार आहे. दुरुस्तीद्वारे केलेली पक्षकथने विसंगत आहेत. त्यामुळेही अर्ज मंजूर करता येणार नाही. अर्ज नामंजूर करावा.

४. दोन्ही वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

५. प्रतिवादीच्या वकीलांनी प्रतिपादन केल्याप्रमाणे, प्रतिवादीने दाखल केलेला दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ चा अर्ज नामंजूर केल्यानंतर वादीने प्रस्तुतचा अर्ज दिलेला आहे हे बरोबर आहे. परंतु वादीच्या वकीलांनी प्रतिपादन केल्याप्रमाणे, दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ च्या अर्जाचा निकाल दोन्ही बाजूला संधी देवून गुणदोषावर पारित करण्यात आलेला आहे. त्या निर्णयाविरुद्ध वरिष्ठ न्यायालयामध्ये दाद मागण्याचे अधिकार प्रतिवादीला आहेत. परंतु केवळ त्यामुळे वादीने त्या अर्जाच्या अनुषंगाने उपस्थित केलेल्या मुद्द्यांचे स्पष्टीकरण किंवा खुलासा दुरुस्तीद्वारे देताच येणार नाही अशी हरकत प्रतिवादीला घेता येणार नाही.

६. उलट वादीच्या वकीलांनी प्रतिपादन केल्याप्रमाणे, वादीने प्रतिवादीविरुद्ध फौजदारी खटला क्र. ५५/२०१६ दाखल केली असून तो न्यायप्रविष्ट आहे ही बाब प्रतिवादीने नाकारलेली नाही. त्याबाबतचा उल्लेख वादीने दाव्यात केलेला आहे. प्रस्तुत अर्जाद्वारे वादी फौजदारी खटला क्र. ५५/२०१६ बाबत जादा खुलासा देणारा मजकुर नमुद करु इच्छित आहे असे अर्जातील मजकुरावरुन दिसून येते. त्याचप्रमाणे दुरुस्तीद्वारे वादी प्रतिवादीच्या खरेदीपत्राची

माहिती वादीला निश्चित केव्हा झाली याची तारीख नमुद करु इच्छित आहे असे दिसते. दाव्यातील एकंदर पक्षकथने वाचली असता दावा दाखल करण्यासाठी वादीला केव्हा कारण घडले ही बाब वादीने यापूर्वीच नमुद केली आहे. शिवाय फौजदारी खटला क्र. ५५/२०१६ बाबतचा मजकुरही नमुद केला आहे. शिवाय फौजदारी खटला क्र. ५५/२०१६ च्या प्रमाणित सत्यप्रतीही न्यायालयात हजर केल्या आहेत. सदरची बाब लक्षात घेता वादीने अर्जात मागितलेली दुरुस्ती ही मूळ दाव्यातील पक्षकथनामध्ये जादा खुलासा देणारी आहे असे दिसते. त्यामुळे मूळ दाव्याच्या स्वरुपात बदल होत नाही, या वादीच्या कथनामध्ये तथ्य दिसते.

७. वादी–प्रतिवादीच्या दरम्यानचा वाद गुणदोषावर निकाली होण्यासाठी वादीने मागितलेली दुरुस्ती मंजूर करणे आवश्यक आहे. दुरुस्तीनंतर प्रतिवादीला जादा कैफियत देण्याची मुभा आहे. त्यामुळे दुरुस्ती मंजूर केल्यास प्रतिवादीचे फारसे नुकसान होणार नाही. याउलट दुरुस्ती नामंजूर केल्यास वादीला तांत्रीक अडचणींना सामोरे जावे लागण्याची शक्यता नाकारता येणार नाही. तांत्रीक कारणाकरीता न्याय नाकारता येणार नाही. त्यामुळे नैसर्गिक न्यायतत्वानुसार वादीला दावा दुरुस्त करण्याची परवानगी देणे आवश्यक आहे. म्हणून पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.
२. वादीने दाव्यामध्ये दुरुस्ती करुन दुरुस्त दाव्याची प्रत मुदतीत अभिलेखावर सादर करावी.

सही/–

इस्लामपूर (श्रीमती सु. रा. पाटील)

दिनांक–२५.०४.२०१९ दिवाणी न्यायाधीश व. स्तर, इस्लामपूर